दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 29 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 44 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## प्रशासन आणि बचावकार्याचा तातडीचा प्रयत्न

**धाराशिव–**आतिवृष्टीमुळे सर्वाधिक फटका करमाळा आणि माढा तालुक्यांना बसला आहे. विशेषतः माढ्यातील अनेक गावं पूर्णतः जलमय झाली होती. मागील आठ दिवसांपासून प्रशासन आणि एनडीआरएफच्या पथकांनी तातडीने बचावकार्य सुरू केलं. कोल्हापूर, सांगली, लातूर आणि पुण्यातून बोटी मागविण्यात आल्या. एकूण २५ बोटी आणि १८० जवानांनी बचाव मोहिमेत सहभाग घेतला. माढा तालुक्यातील दरफळ आणि सुलतानपूर या गावांमध्ये परिस्थिती अतिशय बिकट होती. नागरिकांचा जीव धोक्यात होता. यावेळी जिल्हा प्रशासनाने ७२ ठिकाणी शेल्टर होम सुरू करून पूरग्रस्तांना आसरा दिला. प्रत्येक शेल्टर होममध्ये पाणी, अन्न, औषधं, वीज यांची सोय करून देण्यात आली आहे.

# मराठवाड्याला अतिवृष्टीचा मोठा फटका

## ८९२ घरांची पडझड; जायकवाडी धरणाचे २७ दरवाजे उघडले

### जायकवाडी धरणाच्या २७ दरवाजांतून २.९२ लाख क्युसेक वेगाने विसर्ग सुरू

**सध्या जायकवाडी धरणातून २ लाख ९२ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणाचे एकूण १८ नियमित आणि ९ आपत्कालीन दरवाजे (एकूण २७ दरवाजे) उघडण्यात आले आहेत. गोदावरी नदीला पूर आल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्याने गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असून, नदीकाठच्या गावांच्या शेतांमध्ये पाणी साचल्याची माहिती आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे पुढील २४ तास गोदावरी नदीकाठच्या लोकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.**

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–** मराठवाड्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठी जीवित आणि वित्तहानी झाल्याची गंभीर आकडेवारी समोर आली आहे. या पावसामुळे विभागात एकूण ६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर खासगी आणि सार्वजनिक मालमत्तेचेही मोठे नुकसान झाले आहे. एकूण ८९२ हून अधिक घरांची पडझड झाली असून, अनेक ठिकाणी रस्ते आणि पूल वाहून गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.मानवी हानीचा विचार केल्यास, अतिवृष्टीत झालेल्या ६ मृत्यूंपैकी नांदेड जिल्ह्यात वीज पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर धाराशिव जिल्ह्यात ३ जण वाहून गेले. नांदेड आणि बीड जिल्ह्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला. याव्यतिरिक्त, धाराशिव जिल्ह्यात ५, तर बीड जिल्ह्यात १ व्यक्ती जखमी झाली आहे. जीवित हानीबरोबरच पशुधनाचेही मोठे



नुकसान झाले असून, विभागात एकूण २१३ जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. यामध्ये धाराशिवमध्ये सर्वाधिक ८१ आणि जालना जिल्ह्यात ४० जनावरांचा समावेश आहे. दगावलेल्या जनावरांमध्ये दुधाळ (९८ मोठी, ८६ लहान) आणि ओढकाम करणाऱ्या (२५ मोठी, ७ लहान) जनावरांचा समावेश आहे.अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील एकूण ८९२ खासगी मालमत्तांची पडझड झाली आहे. यात धाराशिव जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला असून, येथे ६११ घरांचे नुकसान झाले आहे. याशिवाय, लातूरमध्ये ८९, छत्रपती संभाजीनगरमध्ये ७३, नांदेडमध्ये ५६, परभणीमध्ये ४२ आणि जालन्यात २१ घरांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. खासगी मालमत्तेसोबतच सार्वजनिक सुविधांचाही मोठा फटका बसला असून, मराठवाड्यात एकूण ९ पूल वाहून गेले आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर आणि बीडमध्ये प्रत्येकी ४, तर परभणीतील एका पुलाचा समावेश आहे.या व्यतिरिक्त, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४ रस्ते वाहून गेल्याने वाहतूक खंडित झाली आहे. शैक्षणिक सुविधांमध्येही नुकसान झाले असून, धाराशिवमधील ६ आणि छत्रपती संभाजीनगरमधील २ अशा एकूण ८ शाळांचेही नुकसान झाले आहे. मराठवाड्याला बसलेल्या या मोठ्या नैसर्गिक आपत्तीमुळे तातडीने मदतकार्य आणि पुनर्वसन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### गोदावरी नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ

**गोदावरी नदीचे उगमस्थान असलेल्या नाशिक जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे गोदावरीला पूर आला आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगरमध्येही पाऊस सुरू असल्याने गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या जायकवाडी धरणात पाण्याची आवक लक्षणीय वाढली आहे. परिणामी, धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे.**

## रामकथेच्या श्रावणाने जीवनातील व्यथा दूर होते–रामायणाचार्य ढोक महाराज

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)–**रामकथेच्या श्रावणाने जीवनातील व्यथा दूर होतात. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर राम कथेतून मिळते. असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले .येथील श्री.योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने २४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर सोमवार पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या रामकथेस बुधवारी प्रारंभ झाला.



यावेळी उपस्थित भक्तांना संबोधित करताना ढोक महाराज म्हणाले की,आपल्या देशात एकही असा माणूस नाही.ज्याला रामायण माहित नाही. समाजात असलेली आदर्श जीवनमूल्ये रामायणाच्या माध्यमातूनच समाजात संक्रमित झाली आहेत. एक आदर्श राजनीती,जीवन पद्धती सांगणारा ग्रंथ म्हणून रामायणाकडे पाहिले जाते. पुढे बोलताना ढोक महाराज म्हणाले की देशात अखंडता टिकवायची असेल तर महाराष्ट्रात अखंडता पाहिजे. महाराष्ट्रातली ऐकी टिकविण्यासाठी आपल्या जिल्ह्यात ऐकी पाहिजे. जिल्ह्यात एकी टिकविण्यासाठी तालुक्यात एकी पाहिजे. तालुक्यातील एकी टिकविण्यासाठी आधी गावात एकता पाहिजे.गावातली ऐकी टिकविण्यासाठी आधी आपल्या कुटुंबात एकता पाहिजे. कुटुंबातली ऐकी टिकवण्यासाठी बंधूंचं बंधूंवर प्रेम असल पाहिजे.ते प्रेम कसं असावं यासाठीच रामायण ऐकलं पाहिजे. असे अनेक संदर्भ देत त्यांनी उपस्थितांना रामायणातील अनेक प्रसंग सांगितले. प्रारंभी रामायणाची पूजा देवल कमिटीच्या विश्वस्तांनी केली.महाआरती राजकिशोर मोदी यांनी केली.ढोक महाराज यांचे स्वागत देवल कमिटीचे सचिव गिरधारीलाल भराडिया,उत्सव प्रमुख उल्हास पांडे, भगवानराव शिंदे,सौ.पूजा राम कुलकर्णी, सौ.गौरी जोशी, शिरीष पांडे, श्रीराम देशपांडे यांनी केले.रामकथा ऐकण्यासाठी महिला व भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा–एसएफआय

**वडवणी (प्रतिनिधी)–**गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्रामध्ये बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यासह, मराठवाड्यात व राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आसमानी संकटाने शेतकरी राजा मोठ्या संकटात सापडला आहे. यामुळे अनेक शेतकरी कुटुंब व नागरिक बेघर झाले आहेत तर अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षे २०२५-२६ चे प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क व सर्वच प्रकारचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे अशी मागणी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात येत आहे. राज्यात अनेक भागात अद्यापही मदत पोहचली नाही अशा अनेक भागात पूरपरिस्थिती आहे.



पिकांचे मोठे नुकसान झाले आहे तर अनेक शेतकऱ्यांची शेती वाहून गेली आहे. अशा परिस्थिती मध्ये शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्याच्यापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये मुलाबाळांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे अशा परिस्थितीमध्ये शासनाने महाराष्ट्रामध्ये ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरभरून मदत करावी तसेच सरसकट महाराष्ट्रामधील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क व इतर सर्व प्रकारचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी ५०,०००/- मदत शासनाने तात्काळ द्यावी, पूरग्रस्त भागामध्ये ज्यांच्या घराचे व इतर नुकसान झाले आहे त्यांना आर्थिक मदत करावी, अतिवृष्टी व पूर परिस्थितीमध्ये वाहून गेलेल्या व मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये आर्थिक मदत व कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेमध्ये नोकरी द्या या सर्व मागण्या वडवणी तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने करण्यात आल्या आहेत. यावेळी एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, जोतिराम कलेढोन, तालुकाध्यक्ष करण साळवे, अभिषेक अडागळे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शारदा दुर्गा उत्सवाच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद



**गेवराई (प्रतिनिधी)–**शारदा दुर्गा उत्सव समितीच्या वतीने होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन गेवराई शहरातील नगरपरिषद कॉलनी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित जेष्ठ महिलांच्या हस्ते करण्यात आले. महिलांना आपल्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व महिलांना विविध खेळ, प्रबोधन, आरोग्य विषयक माहिती अशा कार्यक्रमाने सतत प्रयत्नशील असणाऱ्या नगरपरिषद कॉलनीतील दुर्गा उत्सव समितीच्या वतीने होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. होम मिनिस्टर कार्यक्रमाचे निवेदक तथा पत्रकार सुशील टकले यांनी उपस्थित लहान मुलांसह महिलांचे विविध खेळ घेऊन मनोरंजनात्मक कार्यक्रम केला. अनेक बक्षिसांचा वर्षाव करीत कोण होणार गेवराईची होम मिनिस्टर या कार्यक्रमाला महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. शहरातील नगरपरिषद कॉलनी येथील शारदा दुर्गा उत्सव समितीच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध व्याख्यान, आरोग्य विषयक माहिती व सामाजिक माहिती व्हावी, यासाठी समुपदेशन कार्यक्रम, विविध खेळ, रास दांडिया कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन नवरात्रीमध्ये करण्यात आले आहे. शारदा दुर्गोत्सव समितीच्या वतीने दिनांक २४ सप्टेंबर बुधवार रोजी सायंकाळी नगरपरिषद कॉलनी येथे भव्य होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिलांसाठी अनेक बक्षिसांचा वर्षाव करीत सुशिल टकले प्रस्तुत कोण होणार गेवराईची होम मिनिस्टर हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात महिलांचे विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले. उखाणा स्पर्धा, फुगा फोडणे स्पर्धा, जनरल नॉलेज स्पर्धा, संगीत खुर्ची, रस्सीखेच, तळ्यात मळ्यात, फुगा फुगवणे, उखाणा घेणे, मोर पिसारा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या या सर्व स्पर्धांमध्ये महिलांनी भरभरून प्रतिसाद देत प्रत्येक खेळात आपली उपस्थिती दर्शवली. होम मिनिस्टर कार्यक्रमाचे निवेदक तथा पत्रकार सुशिल टकले यांच्या बहारदार निवेदनाने प्रत्येक कार्यक्रमात रंगत आली.

## शेतकऱ्यांना सरसकट मदत देऊन कर्ज माफी करा–वंचित बहुजन आघाडी

**गेवराई (प्रतिनिधी)–** गेवराई तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत देऊन कर्जमाफी करण्यात यावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुकाध्यक्ष अजय उर्फ पप्पू गायकवाड, बीड जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.
याबाबत गेवराई तहसीलदारांमार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील काही दिवसांपूर्वी गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने शेतपिकांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक ठिकाणची नदी व ओढ्याच्या परिसरातील शेतकऱ्यांची पिके पूरात वाहून गेली आहेत. त्यामुळे शासनाने वेळ न घालविता तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच या संकटामुळे शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्याला तात्काळ कर्जमाफी करण्यात यावी, शेतकऱ्यांसह शेतमजुरांना देखील तसेच गायरानधारक व सिलिंगधारक यांना देखील तात्काळ अनुदान देण्यात यावे. त्याचबरोबर या पूर परिस्थितीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य वाहून गेले तर काहींचे भिजल्याने खराब झाले. त्यामुळे शासनाने पुनश्च एकदा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करावे तसेच विद्यार्थ्यांची परीक्षा फीस माफ करण्यात यावी.
नुकसानभरपाई पोटी देण्यात येणारे अनुदान हे दिवाळीच्या आधी देण्यात यावे. अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला गेवराईचे तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका अध्यक्ष पप्पू गायकवाड , बीड जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पोकळे, किशोर भोले, किशोर चव्हाण, ज्ञानेश्वर हवाले, कृष्णा हातागळे, सुनील चव्हाण, धुराजी राठोड, गायरानधारक, सिलिंगधारक, पोट खराबाधारक, शेतकरी व ने शेतमजूर बहुसंख्येने उपस्थित होते.

## पत्रकार कल्याण निधी वाढीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा तीन वर्षांचा संघर्ष यशस्वी

**वडवणी (प्रतिनिधी)–** पत्रकार कल्याण निधी वाढीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा तीन वर्षांचा संघर्ष अखेर यशस्वी ठरला आहे. आज महाराष्ट्र शासनाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी अंतर्गत २० कोटी रुपयांच्या पुरवणी अनुदानास प्रशासकीय मान्यता दिली असून त्यामुळे या निधीची एकूण ठेव १०० कोटींवरून १२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे . या निर्णयामुळे आकस्मिक मृत्यू, अपघात किंवा गंभीर आजाराच्या प्रसंगी पत्रकारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या मदतीचा आधार आणखी भक्कम झाला आहे. तसेच ज्येष्ठ पत्रकारांसाठी दरमहा मिळणाऱ्या मानधनाचा लाभ अधिक व्यापक स्वरूपात देणे शक्य होणार आहे.
या ऐतिहासिक निर्णयाबाबत 'व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे म्हणाले की, पत्रकारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी आम्ही तीन वर्षे अहोरात्र लढा दिला. शासन दरबारी अनेकदा निवेदने दिली, सात वेळा आंदोलने केली. सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्या संघर्षाला यश आलं आहे. निधीत २० कोटींची वाढ करून सरकारने पत्रकारांप्रती कृतज्ञतेची भावना दाखवली आहे. हा विजय व्हॉईस ऑफ मीडियाच्या नाही तर तो संपूर्ण पत्रकार बांधवांचा आहे. आम्ही महाराष्ट्र सरकारचे मनःपूर्वक आभार मानतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसाठी नेहमी चांगली भूमिका घेतली आहे.
याचबरोबर राज्याध्यक्ष अनिल म्हस्के यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, पत्रकारांच्या आकस्मिक संकटाच्या वेळी दिलासा देणारा हा निधी म्हणजे आशेचा हात आहे. निधी वाढल्याने अनेक कुटुंबांचे डोळे पुसले जातील. या मागणीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाने राज्यभर सातत्याने लढा दिला आणि अखेर सरकारने सकारात्मक निर्णय घेतला. हा विजय पत्रकारांच्या एकतेचा आणि संघर्षशक्तीचा पुरावा आहे. पुढेही पत्रकारांच्या हक्कांसाठी आमचा संघर्ष अखंड राहील.सरकारच्या या निर्णयामुळे व्हॉईस ऑफ मीडिया संघटनांमध्ये उत्साहाचे वातावरण असून पत्रकार बांधवांमध्ये समाधान आणि दिलासा व्यक्त होत आहे. आज जीआर निघताच अनेक पत्रकार बांधवानी व्हॉईस ऑफ मीडियाचे आभार मानले.

संपादकीय

# वेडाचे बळी



तामिळनाडू या राज्यातील अभिनेते साक्षात ईश्वर समजले जातात आणि क्रिकेटमध्ये सचिन तेंडूलकरला जे स्थान आहे तेच तेथील लोकप्रिय अभिनेत्यांना असते. डेमी गॉड्स असे हे अभिनेते समजले जातात, दक्षिणेत या चित्रपट अभिनेत्यांची मंदिरे उभारली गेली आहेत. इतक्या पराकोटीचे वेड तेथे आहे. त्यामुळे विजय थलपती या अभिनेत्याच्या रॅलीत काल करूर येथे घडलेल्या चेगराचेंगरीची घटना दुःखदायक असली तरीही आश्चर्यकारक मुळीच नाही. अभिनेते विजय यांच्या रॅलीत झालेल्या गर्दी आणि चेंगराचेंगरीमुळे ३९ लोक ठार झाले, तर कित्येक लोक जखमी झाले. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी मृतांच्या नातेवाइकांना मदत वगैरे जाहीर केली आणि या घटनेची चौकशी होणार आहे. पण तामिळनाडूतील लोकांचे वेड कमी होत नाही. यापूर्वीही कित्येक अभिनेते आणि अभिनेत्री यांनी तेथे लोकांना वेड लावले आहे आणि त्यात अनेक लोकाचे प्राण गेले आहेत. तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री दिवंगत एमजी रामचंद्रन, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री राहिलेले एन. टी. आर, जयललिता आणि सध्या राजकीय पक्ष काढून राजकारणात स्वतःचा धाक जमवण्याच्या प्रयत्नात असलेले कमल हसन असे किती तरी नेते आहेत ज्यांनी राज्यावर आधी अभिनयाने आणि नंतर राजकारणात जाऊन राज्य केले आहे. त्यांच्यामागे हजारो लोक असतात आणि त्याच्यासाठी ते प्राणही त्यागण्यास तयार असतात. एखाद्या नेत्याचे निधन होते तेव्हा त्यांच्यामागे कित्येकांनी आत्महत्या केल्याची उदाहरणं आहेत. हे पराकोटीचे वेड लोकांना त्यांच्या आत्मघातामागे घेऊन जाते असे दिसते. विजय थलपती हा दक्षिणेतील सर्वाधिक मानधन घेणारा स्टार आहे. रजनीकांत आणि धनुष हे असेच सर्वाधिक मानधन घेणारे कलाकार आहेत. जितके हे स्टार लोकप्रिय होतात तितकेच त्यांचे फॅन फॉलोईंग वाढत जाते आणि मग त्यांना नुसतं पाहण्यासाठी हे लोक काहीही करण्यास तयार होतात. हेच विजय यांच्या रॅलीत घडले. करूर या जिल्ह्यात विजय येणार होते. पण त्यांना यायला उशीर झाला. उशीर झाल्याने लोक अगोदरच त्रस्त झाले होते आणि त्यात पुरेशी व्यवस्थाही नव्हती. त्यामुळे लोकांनी विजयला पाहण्यासाठी खेचाखेच केली आणि तेथे झालेल्या अभूतपूर्व चेंगराचेंगरीत ३९ लोक ठार झाले.या घटनेने तमिळ लोकांचे चित्रपट अभिनेत्यांबद्दल असलेले वेड आणि तेथील राजकारण यांचे सरमिसळ कशी केली जाते याचे विदारक चित्र ही घटना दर्शवते. विजय यांचा पक्ष अजून बाल्यावस्थेत आहे पण त्यांच्या चाहत्यांच्या गर्दीने विजय यांना ब्लॉक बस्टर चित्रपटाचे अनाकलनीय आणि कल्पनातीत असे भावनात्मक वलय प्राप्त करून दिले आहे. विजय यांच्या रॅलीत जमलेली गर्दी ही राजकीय गर्दी नव्हती हे पहिल्या प्रथम लक्षात घेतले पाहिजे. विजय यांच्या चाहत्यांची गर्दी ही टिपिकल पक्ष कार्यकर्त्यांची नव्हती, तर ती सिनेमा वेडाने पछाडलेली होती हा इतर मेळाव्यातील आणि या गर्दीतील फरक आहे. दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीतील अभिनेत्यांचे वेड कसे पराकोटीला गेले आहे हे याच घटनेवरून लक्षात येते आणि यापूर्वीच्या कित्येक घटनांवरूनही लक्षात येतेच. आणखी एक दाक्षिणात्य अभिनेत्री आहे जिचे नाव आहे खुशबू. दक्षिणेत तिचे मंदिर उभारले आहे. विजय यांना प्रचंड उशीर झाला तरीही त्यांचे चाहते थांबले होते आणि नंतर त्यांनी विजय यांना पाहण्यासाठी भयानक गर्दी केली असे प्रत्यक्ष फुटेज सांगतात. त्यातच एकोणचाळीस लोकांचा बळी गेला. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. ज्या तीव्रतेने विजयचे चाहते त्यांना पाहण्यासाठी आले होते ते केवळ दक्षिणेतच पाहायला मिळते. तामिळनाडूत विजय यांचा थेट सामना द्रमुकशी आहे. त्यामुळे जमलेल्या गर्दीत विजय यांचे चाहते अधिक संख्येने होते तसेच द्रमुकचे प्रेमी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा थेट सामना कोण अधिक लोकप्रिय असा होता. विजय यांच्याकडे फॅन फॉलोईंग आहे तसेच त्यांच्याकडे पक्षाची विचारधारा आहे पण प्रशासनाने हा मेळावा हाताळण्यात अक्षम्य ढिलाई केली हे खरे आहे. कारण प्रशासनाने विजय यांच्या मेळाव्यासाठी गर्दी आटोक्यात आण्यासाठी तितके प्रयत्न केले नाहीत. विजय यांनी प्रशासनाला माहिती दिली होती, की फक्त १० हजार प्रशंसक येतील. पण प्रत्यक्षात त्यापेक्षा चारपट अधिक लोक हजर होते.विजय यांच्या चाहत्यांना ज्या अडचणींचा सामना करावा लागला त्यामुळे लोकांचा संताप होणे साहजिक होते. पण डिजिटल युगात विजय यांच्या चाहत्यांच्या प्रचंड संख्येने जमणे आणि लोकांनी त्यांचे भाषण ऐकणे आणि त्यात झालेल्या गर्दी आणि चेंगराचेंगरीत प्राण गमावणे हे अभूतपूर्व आहे. विजय यांचा चाहता वर्ग आज सर्वत्र वाढत आहे कारण त्यांना कमल हसन आणि चिरंजीवी वगळता फारसे प्रतिस्पर्धी उरलेले नाहीत. त्यामुळे विजय यांच्या रॅलीत दुर्घटना घडण्यामागे द्रमुक प्रशासन, पोलीस आणि न्यायालयाची असहाय्यता हीच कारणं आहे असे लक्षात येते. विजय यांची अपेक्षा होती त्यापेक्षा अधिक लोक जमले. इतक्या अफाट लोकसंख्येचे व्यवस्थापन करण्यात तामिळनाडू प्रशासन अपयशी ठरले हे सत्य आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून काय उपाय करता येतील याचा विचार आता केला जाईल, कारण ही काही पहिलीच घटना नाही आणि अखेरची तर नाहीच. बंगळूरूमध्ये आरसीबी चाहत्यांनी अशीच गर्दी केली होती आणि त्यात ११ चाहत्यांचा मृत्यू ओढवला होता. तेव्हाही हेच प्रश्न उपस्थित झाले होते. आता सर्वांनी सजग राहून उपाय करण्याची वेळ आली आहे.

# नको हे विरोधक

निम्म्या महाराष्ट्राला अतिवृष्टीने उद्ध्वस्त केल्यानंतर हवामान विभागाने कालच आणखी किमान दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज दिला आहे. ५ ऑक्टोबरनंतरच मान्सून परतीला निघेल, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. पावसाने या आठवड्यात महाराष्ट्रात उडवलेला हाहाकार ज्यांनी प्रत्यक्ष बघितला असेल किंवा ज्यांनी त्याची दृश्य टीव्हीवर पाहिली असतील, ते हवामान खात्याचा नवा अंदाज पाहून खोल काळजीत बुडाल्याशिवाय राहणार नाहीत! निसर्गाने उभी केलेली संकटं अशी असतात, की ती रोखता येत नाहीत. त्यांच्यापासून काही प्रमाणात आपला बचाव करता येतो. पावसाचं येणं, न येणं पूर्णपणे त्याच्या लहरीवर असतं. ना आग्रहाने तो येतो, ना थांब म्हटल्याने तो थांबतो. त्याची कृपा (किंवा अवकृपा) स्वीकारण्याशिवाय आपल्या हाती काही नसतं. विज्ञानाच्या प्रगतीने अशा संकटांच्या काही आगाऊ सूचना मिळाल्याच, तर मनाची तयारी करायला थोडा वेळ मिळतो; नुकसान रोखण्यासाठी आवश्यक ती काळजीही काही प्रमाणात घेता येते. पण, शेतात उभ्या पिकाचं, फळबागांचं काय करणार? पिकं काढणीला आली असतील, तर घाईने कापणी करता येते. पिकली फळं उतरवून ठेवता येतात. पण, हे सगळे प्रयत्न आपलं नुकसान त्यातल्या त्यात कमी करण्याचे असतात. त्यापेक्षा अधिक काही आपल्या हाती नसतं. म्हणूनच पावसाचे बदलणारे पॅटर्न समजावून घेऊन त्यानुसार आपण आपली शेती, जगणं मापणं आवश्यक असतं. महाराष्ट्रातच काय, पूर्ण देशातच अशी वेळ आली आहे. या क्षेत्रातील आपली संशोधनं आपल्याला त्या दिशेने न्यावी लागणार आहेत.परतीच्या पावसाने दणका देण्याचं हे काही पहिलं वर्ष नाही. यापूर्वी आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेशच्या पूर्व भागात परतीच्या पावसाने महापूर यायचे. गावं जलमय व्हायची. पण, या वर्षीचं चित्र अगदी वेगळं आहे. जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशाबरोबरच गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब या राज्यांतही



परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. देशाचं धान्याचं कोठार म्हणून जी राज्यं गणली जातात, त्या पंजाब, हरियाणात झालेली अतिवृष्टी आणि आलेले पूर देशाला अन्नधान्याच्या बाबतीत मोठा फटका दिल्याशिवाय राहणार नाहीत. अन्यत्र झालेल्या अतिवृष्टीनेही डाळी, कडधान्य, सोयाबीन, कापसाच्या पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. देशाचा शेती उत्पादनाचा मूळ हिशोबच यावर्षी पूर्ण बिघडून जाणार आहे. हे नुकसान नक्कीच कमी नसेल. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, दिवाळीनंतर याबाबतचे अंदाज समोर येतील. बदललेल्या निसर्गचक्राने भारतीय शेतीचं; आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेचं किती नुकसान केलं आहे, ते त्यावेळी कळेल. पूर्वी वारावादळं होत नव्हती, ढगफुटी होत नव्हत्या असं नाही. त्याचं प्रमाण अपवादात्मक असे. आता ते सर्रास होऊ लागलं आहे. मान्सूनचं वेळेपूर्वी आगमन, कमी वेळात अचानक जास्त कोसळणं आणि त्यानंतर मुक्काम लांबवणं या पूर्ण चक्राचाच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. हे बदललेलं चक्र शेती आणि शेतकऱ्याच्या मुळावर आलंच आहे. पण, देशाच्या पायाभूत सुविधा यंत्रणांवरही त्याचा परिणाम होतो आहे. रेल्वे, रस्ते इमारती, मोठे पूल, वीज वाहिन्यांचं जाळं, दूरसंचार नेटवर्क हा पाऊस उद्ध्वस्त करतो आहे. शेती आणि पर्यावरणीय नुकसानीला याची जोड दिली, तर बदललेल्या पाऊसमानाचा आपल्या अर्थव्यवस्थेला किती मोठा फटका बसतो आहे, हे लक्षात येईल. अशा नुकसानीचा विचार करताना कधीच मानवी भावभावना, आकांक्षा, स्वप्नं, नातेसंबंधावर कसं पाणी फिरतं, याची मोजदाद होऊ शकत नाही. ती करता आली, तर हे नुकसान मोजण्याच्या पलीकडचं असेल! या सगळ्या प्रतिपादनाचा मथितार्थ एवढाच, की पावसाचा हा बदललेला स्वभाव पाहून त्यानुसार आपल्याला तातडीने उपाययोजना कराव्या लागतील. कृषी शास्त्रज्ञांवर याची सर्वात मोठी जबाबदारी असेल. जोडीला हवामानशास्त्रज्ञ, अभियंते, नगर रचनाकार आणि व्यवस्थापन तज्ज्ञांची जोडही लागेलच. अचानक येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यांचा निचरा होण्यासाठी काँक्रिटीकरणाच्या वेडाला आवर घालणं, जुन्या ओढ्या-नाल्यांना पुनरुज्जिवीत करणं, नद्यांभोवतीची अतिक्रमणं दूर करणं, नद्यांची पात्र रुंद आणि खोल करणं, तलाव-धरणातले गाळ काढणं या उपाययोजना प्राधान्यक्रमाने आणि कठोरपणे अमलात आणाव्या लागतील. अन्यथा, दरवर्षी संपत्तीची, मानवी कर्तृत्वाची मोठी हानी होत राहील. त्याच्या नुकसान भरपाईसाठी पैशाच्या राशी ओततच राहाव्या लागतील. महाराष्ट्रात अतिवृष्टी झालेल्या अनेक गावांचा संपर्क पाऊस थांबून दोन दिवस झाले, तरी अद्याप शक्य नाही. साचलेलं पाणी आणि चिखल यामुळे तिथपर्यंत मदत घेऊन जाणंही सोपं नाही. तरीही मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक झाल्या झाल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संपूर्ण मंत्रिमंडळ महाराष्ट्राच्या सर्व अतिवृष्टीग्रस्त भागात पोहोचलं होतं, ही अभिनंदनीय बाब आहे. त्याबाबत समाधान व्यक्त करायचं सोडून विरोधी पक्षांनी पुन्हा तीच ठरलेली टीका सुरू केली आहे. लोकांनी ज्यांना विरोधी बाजूला ढकललं, त्यांनी सतत अवास्तव मागण्याच करत राहिलं पाहिजे, संकटात सापडलेल्यांच्या दुःखावर फुंकर घालण्याऐवजी त्यांची मनःशांती बिघडवली पाहिजे असा नियम नाही. पण, एकदा बेजबाबदारपणा अंगी भिनला, की तारतम्याशी संबंध सुटतो. महाराष्ट्रातल्या विरोधी पक्षांची भूमिका आणि भाषा पाहता त्याचाच प्रत्यय येतो आहे. हवामान खात्याचा पुढचा अंदाज तर त्यांच्या गावीही दिसत नाही. निम्मा महाराष्ट्र प्रचंड अडचणीत असताना आणि आणखी संकटाचे ढग डोक्यावर जमा होत असताना तरी त्यांनी स्वतःला आवरलं पाहिजे.

# कोकणातील शेतकऱ्यांची नवी उभारी

राज्यात शेतकऱ्यांची जी शेतीची विदारक चित्र माध्यमांवर येतात तशी स्थिती कोकणातही अनेकवेळा आली आहे. येत आहे. अगदी यावर्षीही कोकणातील भातपिकांची कोणाही शेतकऱ्याला कोणतीही शाश्वती देता येणार नाही अशी आताची स्थिती आहे. पावसाने यापूर्वी कोकणातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यावर्षी अनेक भागातील भातशेती मध्यंतरीच्या काळात जो पाऊस कोसळत होता त्यांने भातशेती पाण्याखाली गेली आहे. भातशेती पालघर, रायगड या जिल्ह्यांमध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर आहे आणि सिंधुदुर्गातही अनेक गावातील भातशेती पाण्याखाली होती. भातशेतीला पाऊस आवश्यक होता; परंतु जो पाऊस कोसळला तो अधिकचा कोसळला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस काही थांबत नाही. महाराष्ट्रातील अनेक विभागामध्ये अतिवृष्टीने जनजीवन विस्कळीत झाले आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात जो पाऊस कोसळला त्या पावसाने शेतीची अपरीमित हानी झाली. कोकणामध्ये मे महिन्याच्या दुसऱ्या पंधवरड्यात जर पावसाने हजेरी लावली तर पाऊस ऑक्टोबर अखेरपर्यंत असतो. ऑक्टोबर महिन्यात पाऊस हजेरी लावण्यापुरता असतो; परंतु मे ते सप्टेंबरपर्यंत अविश्रांतपणे पाऊस कोसळत असतो. गेल्या दोन-पाच वर्षांत या ऋतुचक्रात काहीसा बदल झालेला दिसतो; परंतु कोकणात काही भागांत भरपूर पाऊस कोसळतो. काही घरांमध्ये पाणी भरणे, त्या भागात राहणाऱ्या रहिवाशांना पावसाळी हंगामात दोन-पाच वेळा अशा प्रसंगांना तोंड द्याव लागतंच लागतं. नदी वा खाडी किनारी भागांमध्ये दरवर्षी पाणी वाढतं. कधी-कधी सह्याद्रीपट्ट्यातील भागात भरपूर पाऊस कोसळला तरी त्याचा फटका खालील गावांना बसतो; परंतु जी काही परिस्थिती निर्माण होते त्याला सामोरे जाण्याचा प्रयत्न कोकणातील सर्वसामान्यजन, शेतकरी करीत असतो. कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणपणे पाऊस हा सारख्याच प्रमाणात पडत असतो.रायगड जिल्ह्यात डोंगर उतारावर लोकवस्ती आहे. यामुळे वाडी, गाव दुर्दैवाने डोंगर खचल्याने त्याखाली येण्याची शक्यता असते असे प्रसंग यापूर्वीही कोकणातील रायगड, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये झालेले आहेत. बाजारपेठा पाण्याखाली सर्वसाधारणपणे दरवर्षीच येतात.



नदीपात्रातील गाळ काढण्यात आला पाहिजे. त्यातून नदी किनारी असणाऱ्या लोकवस्तीला पाणी वाढण्याचा धोका संभवणार नाही. भातशेती यावर्षी कोकणामध्ये तिन्ही जिल्ह्यात पाण्याखाली आली आहे. राज्यात शेतकऱ्यांची जी शेतीची विदारक चित्र माध्यमांवर येतात तशी स्थिती कोकणातही अनेकवेळा आली आहे. येत आहे. अगदी यावर्षीही कोकणातील भातपिकांची कोणाही शेतकऱ्यांला कोणतीही शाश्वती देता येणार नाही अशी आताची स्थिती आहे. पावसाने यापूर्वी कोकणातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यावर्षी अनेक भागातील भातशेती मध्यंतरीच्या काळात जो पाऊस कोसळत होता त्यांने भातशेती पाण्याखाली गेली आहे. भातशेती पालघर, रायगड या जिल्ह्यांमध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर आहे. सिंधुदुर्गातही अनेक गावातील भातशेती पाण्याखाली होती. भातशेतीला पाऊस आवश्यक होता; परंतु जो पाऊस कोसळला तो पाऊस अधिकचा कोसळला आहे. त्यामुळे भातपीक 'पोसवण' जे म्हणतात ते वेळेत होण्याऐवजी तो कालावधी लांबणीवर पडण्याची एक शक्यता आहे आणि त्याबरोबर भातपीक तयार न होता लोंबीमध्ये दाणे तयार होण्याची शक्यता मंदावली आहे. परिणामी 'चिम' होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोकणातील शेतकऱ्याचे नुकसान होऊनही तो कधी शासनदरबारी जात नाही. काही द्या म्हणून मागत नाही. माध्यमांसमोर कोकणातील शेतकऱ्यांने कधी आक्रोश केल्याचे चित्र कधीच दिसणार नाही. केवळ भात शेतीचेच नव्हे तर आंबा, काजू, कोकम, नारळ, सुपारी बागायतदार शेतकरीही कधी नुकसानीसाठी पुढे येताना दिसत नाही. आताच्या स्थितीतही कोकणातील सुपारी बागायतदार शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक भागांमध्ये नारळ, पोफळीच्या बागायती आहेत. सुपारी तयार होण्यापूर्वीच त्याचा खच पडला आहे. सुपारी बागायतदारांचे मोठे नुकसान झाले; परंतु एकतर कोकणातील शेतकरी संघटीत नाही. विविध राजकीय पक्षांच्या विचारसरणीत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी संघटीत होत नाही. त्याला दुसऱ्याचे नेतृत्व मान्य नसते. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्याच्या मनातील खदखद त्याच्या मनातच राहून जाते. त्याला संघटीत स्वरूप कधीच येत नाही.कोट्यवधी रुपयांची आंबा, काजू बागायतीत नुकसान होऊनही कधी एकत्र दाद मागण्यात आली नाही. कोकणातील बागायतदार शेतकरी जागा नसला तरीही कोकणातील लोकप्रतिनिधी आंबा, काजू, कोकम या विषयाची चर्चा विधीमंडळात करतात. कोकणात शेतकऱ्यांचे संघटीत होऊन कधी मोठाले मोर्चे निघालेत असेही कधी घडले नाही. याचे कारण कोकणातील शेतकरी शासनाच्या नुकसानभरपाईवर अवलंबून राहत नाहीत. कोकणातील शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली नसतो. आवश्यक असणारे कर्ज काढतो. जे कर्ज घेणार ते परतफेड करण्यासाठी शासनाची शेतकऱ्यांना कर्जमाफी होईल याची प्रतीक्षा न करता आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते नियमित कसे जातील याबाबतीत तो अधिक काळजी घेतो. कोकणातील हत्तीबाधित भागातील शेतकऱ्यांच्या कष्टाने उभ्या केलेल्या शेती-बागायती नष्ट करूनही तो शेतकरी पुन्हा उभा राहतो. हे कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांचे वैशिष्ट्य आहे. दिवाळीच्या जवळपास काही भातपीक तयार होतं; परंतु यावर्षी या पावसाच्या संततधार हजेरीने सर्व वेळापत्रकच कोलमडले. हळव्या भातपिकाचीही नासाडी झाली आहे. कोकणातील या पावसाने भात, नाचणी अशी वरकस होणारी शेतीही हातातून गमवावी लागली आहे. यावर्षी कोसळणारा पाऊस हा कमी वेळेत अधिकचा पाऊस कोसळतो. या कोसळणाऱ्या पावसाने होणाऱ्या ढगफुटीने अचानक वाढणाऱ्या पाण्याने कोकणातील अनेक भागांमध्ये नुकसान झाले आहे; परंतु तरीही कोकणातील शेतकरी नव्या दमाने नवी उभारी घेऊन उभा राहतो. वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या रोजच्या नुकसानीतही तो उभा आहे. हत्ती इलो...!कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेली काही वर्षे रानटी हत्ती येत आहेत. दोडामार्ग, सावंतवाडी या तालुक्यातून हत्तीचा वावर आहे. आतापर्यंत नारळ, पोफळीच्या बागा भातशेती असं सारच हत्तीने उद्ध्वस्त केलं आहे. दोडामार्ग तालुक्यातील जवळपास सर्वच गावातून हत्तीच वास्तव्य राहिलं आहे. मनुष्य वस्तीत हत्ती येत असल्याने भीतीचं वातावरण आहे. हत्तीपकड मोहीम यापूर्वी राबविण्यात आली. हत्ती २० वर्षांपूर्वी दोडामार्ग भागात आले ते कायमस्वरूपीच स्थिरावले आहे. मध्येच कर्नाटक राज्यामध्ये काही काळ जातात; परंतु माघारी फिरतात. गेल्या पंधरवड्यात हत्ती गोव्यातही भ्रमंती करून आले. आता पुन्हा सिंधुदुर्गात आहे. वनविभागही या हत्तींच्या प्रश्नावर हतबल आहे. हत्तीच अभयारण्य आणि वनतारा अशा मुद्यांवर वारंवार चर्चा होत आहे. हत्तीच्या उपद्रवांनी शेतकरी कालही हैराण होता. आजही पूर्वीसारखाच हैराण आहे. कोणत्याही गावातून वस्तीत होणाऱ्या हत्तीच्या मुक्तसंचाराने शेतकरी चिंतातूर आहेत. दिर्घकालिन उपाययोजना शासनाने करणे आवश्यक आहे.

# जिल्हा स्तरीय शालेय तायक्वॉन्डो स्पर्धेत संजीवनी इन्टरनॅशनल स्कुल खारघर ने १४ पदके मिळवुन यश

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तायक्वॉन्डो स्पर्धेत खारघर येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कुल ने १४ पदके पटकावत शाळेचे नाव उच्च पातळीवर नेले आहे. मोरवी भाटी , प्रांजल खोडके यांनी सुवर्ण पदक तर लावण्या सोनटक्के, सर्बजित मोन्डल अक्षय चौधरी या रौप्य पदक खेळाडूंनी सुवर्ण पदक पटकावत शाळेच्या यशात मोठी भर घातली आहे. जसलीन कौर , विहान चौधरी, अरुष राजवर, विश्व वेलणकर, साक्षी चव्हाण, प्रिशा पटानिया, मदीहा हमडुले , मोहम्मद सहजाह, शौर्य पवार हे खेळाडू कास्य पदाचे मानकरी ठरले आहेत. या सर्व खेळाडूंना शाळेचे नाव प्रमुख शिक्षक आंतरराष्ट्रीय तायक्वॉन्डो पंच सुभाष पाटील व सहाय्यक प्रशिक्षक दिनेश म्हात्रे आणि क्रीडा शिक्षक वैभव सोनावणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले या स्पर्धेतील विजयी खेळाडूंचा संजीवनी स्कुलचे प्रिन्सिपल डॉ. अनुराग पान्डे सरांनी विशेष अभिनंदन केले.या खेळाडुंच्या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून, परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



# मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी स्वच्छता मोहीम निरंतर सुरू राहणार उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ए विभागात 'स्वच्छता ही सेवा २०२५' या अभियानांतर्गत केले एकनाथ शिंदे यांनी श्रमदान स्वच्छता करणा-या कामगार - कर्मचा-यांमुळेच मुंबई स्वच्छ, सुंदर आणि हिरवीगार आहे. स्वच्छता कर्मचा-यांमुळे मुंबईकरांचे आरोग्य सुदृढ आहे. स्वच्छता कर्मचारी हे स्वच्छतेचे दूत, वास्तवातील 'हिरो' आहेत. मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी आणि स्वच्छ-सुंदर शहरासाठी सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लीन ड्राईव्ह) सातत्याने सुरू राहणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केले. स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका विविध उपाययोजना राबवित असून त्याचे अनुकरण राज्यातील इतर महानगरपालिकांनी करावे, असेदेखील . शिंदे यांनी नमूद केले.

'स्वच्छता ही सेवा २०२५' या अभियानांतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते दिनांक २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छोत्सव' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्ह्याचे सहपालकमंत्री . मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत (दिनांक २५ सप्टेंबर ) रोजी 'एक दिवस, एक तास, एक साथ' घोषणा देत स्वच्छतेसाठी सामूहिक श्रमदान करण्यात आले, त्यावेळी उपमुख्यमंत्री . एकनाथ शिंदे बोलत होते.महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण





गगराणी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव . के.एच. गोविंद राज, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव . नवीन सोना, महानगरपालिका उपायुक्त (परिमंडळ १) श्रीमती चंदा जाधव, ए विभागाचे सहायक आयुक्त . जयदीप मोरे, इतर अधिकारी, कर्मचारी, कामगार त्याचप्रमाणे शालेय - महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.महानगरपालिकेच्या ए विभागातील महात्मा गांधी मार्ग (मेट्रो चित्रपटगृह ते फॅशन स्ट्रीट) परिसरात लोकसहभागातून सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. रस्ते, पदपथ स्वच्छ करत पाण्याने धुवून काढण्यात आले. तसेच, स्वच्छतेविषयक सामूहिक शपथ घेण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संपूर्ण देशात तसेच राज्यात आज 'एक तास स्वच्छतेसाठी' अभियान सुरु आहे. हे अभियान वर्षभर म्हणजेच ३६५ दिवस सातत्याने सुरु ठेवायचे आहे. महात्मा गांधी म्हणायचे स्वच्छता म्हणजे स्वातंत्र्य. आपण म्हणतो स्वच्छता ही सेवा. त्यासाठी पहिले आपले घर, परिसर, शहर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेकामी पुढाकार घेतल्यास देशामध्ये क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही. स्वच्छ भारत अभियानाच्या निमित्ताने देशात कोट्यवधी स्वच्छतागृहे उभी राहिली. पिण्याचे शुद्ध पाणी कोट्यवधी लोकांच्या घरापर्यंत पोहोचले आहे. स्वच्छतेचे महत्व पटवून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. नगर विकास विभागाने घनकचरा टाकण्यात येणारी सुमारे १९ हजार ९४० ठिकाणे शोधून काढली आहेत. त्यांच्या स्वच्छतेचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. राज्यभर स्वच्छताविषयक लोकसहभागाचे ६ हजार ३१७ कार्यक्रम होणार आहेत. स्वच्छता मित्रांसाठी आरोग्य शिबिरे घेण्यात येणार आहेत. त्याचबरोबर स्वच्छ हरित महोत्सवदेखील घेण्यात येणार आहे. यासमवेतच प्रभात फेरी, स्वच्छता कामगार सन्मान, पायाभूत सुविधांचे लोकार्पण, सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन्मान, सर्वोत्कृष्ट नागरी स्वयंसेवक सन्मान असे विविध उपक्रम 'स्वच्छता ही सेवा' या अभियानामध्ये राबविले जाणार आहेत, असेदेखील शिंदे यांनी नमूद केले. पुढे ते म्हणाले की, स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या ज्या वसाहती आहेत, त्या ठिकाणी अधिकाधिक सुविधा पुरविण्याचे काम हाती घेतले आहे. त्याच्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. स्वच्छता कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी महानगरपालिका आरोग्य शिबिरे घेत आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने यापूर्वी 'डीप क्लीन ड्राईव्ह' अभियान राबविले. अभियानाच्या माध्यमातून मोठे काम झाले. त्याचा मोठा परिणाम झाला. अशाच प्रकारचे स्वच्छता अभियान पुन्हा राबवायचे आहे. १०० टक्के यशस्वी करायचे आहे, असे . शिंदे यांनी नमूद केले. उपमुख्यमंत्री . शिंदे म्हणाले की, स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. एक लाखापेक्षा अधिक वृक्षारोपण केले आहे. नागरी वने, उद्यानांची देखभाल केली जात आहे. 'हरित क्षेत्र' वाढवण्यावर भर दिला जात आहे. महालक्ष्मी रेसकोर्सची जागा उद्यानासाठी घेण्यात आली आहे. मुंबई किनारी मार्ग आणि महालक्ष्मी रेसकोर्स मैदान मिळून सुमारे ३०० एकर जागेवर 'मुंबई सेंट्रल पार्क' चे काम लवकरच सुरु होईल. जागतिक दर्जाच्या सेंट्रल पार्कचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार झाला आहे. खड्डेमुक्त रस्त्यांसाठी रस्ते काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. पुढील दीड - दोन वर्षात मुंबईतील संपूर्ण रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबईकरांना रस्त्यावर एकही खड्डा शोधून देखील सापडणार नाही, यादृष्टिने हा प्रकल्प राबवत आहोत, असे ते म्हणाले.महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण गगराणी म्हणाले की, पंतप्रधान . नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने राज्यभर स्वच्छता पंधरवडा राबविला जात आहे. स्वच्छतेवर दिला जाणारा भर हा केवळ महानगर स्वच्छ दिसण्यासाठी नाही. स्वच्छतेतून निर्माण होणाऱ्या आरोग्यदायी वातावरणामुळे नागरिकांच्या जीवनमानात होणारी सुधारणा हे त्यामागील उद्दिष्ट आहे. स्वच्छ व सुंदर शहर उपक्रम केवळ नावलौकिकासाठीच नव्हे तर सार्वजनिक आरोग्यासाठी देखील महत्वाचा आहे. सार्वजनिक स्वच्छता हे महानगरपालिकेचे प्राथमिक कर्तव्य असून स्वच्छता ही निरंतर प्रक्रिया आहे. सखोल स्वच्छतेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी आणि स्वच्छ - सुंदर मुंबईसाठी सखोल स्वच्छता मोहीम सातत्याने व जोमाने सुरू राहील, अशी ग्वाही . गगराणी यांनी दिली.

# महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी भूम आणि परांडा (जिल्हा धाराशिव) येथील पूरग्रस्तांसाठी तत्काळ मदत जाहीर



**बारामती । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते साधू बल्लाळ यांनी फोनद्वारे परिस्थितीची माहिती देताच, अजितदादांनी तातडीने या परिसरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी पाऊले उचलली आहेत.अतिवृष्टी आणि पावसामुळे भूम आणि परांडा तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांना याचा फटका बसला असून, पिके आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. साधू बल्लाळ यांना समजताच त्यांनी पूरग्रस्त भागाची माहिती घेऊन तेथील बिकट परिस्थितीची माहिती थेट उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कानावर रात्रीच्या २ वाजता फोन द्वारे घातली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासनाला नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून नुकसानग्रस्तांना शासनाच्या नियमानुसार योग्य मदत मिळू शकेल. पूरग्रस्त कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. प्रशासनाने अन्नधान्य, पाणी आणि निवारा यांसारख्या मूलभूत गरजा त्वरित पुरवाव्या याची सुनिश्चिती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. या मदतीमुळे भूम-परांडा परिसरातील पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकार पूर्ण ताकदीने उभे असल्याचे दिसून आले आहे. तसेच ज्या घराचें नुकसान झाले आहे त्या प्रत्येक घरांना पाच पाच हजाराची मदत देण्याचे प्रोसेस चालू आहेत.

# पाचेगाव येथे सोयाबीन शेती दिन उत्साहात साजरा

**शेवगाव । प्रतिनिधी**

श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने मा. अध्यक्ष आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील , उपाध्यक्ष मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील, तज्ञ संचालक डॉ. क्षितीज घुले पाटील आणि सर्व विश्वस्त मंडळ श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत , कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने यांचे मार्फत सोयाबीन समूह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन पाचेगाव ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथे खरीप हंगाम २०२५ मध्ये करण्यात आलेले आहे. यामध्ये फुले किमया या वाणाचे प्रात्यक्षिक सदर गावात ५० प्रगतशील महिला आणि पुरुष शेतकऱ्यांच्या शेतावर



घेण्यात आले आहे. सोयाबीन पिकातील आधुनिक तंत्रज्ञान तळागळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे दृष्टीने हे प्रात्यक्षिक घेतले असून जास्तीत जास्त उत्पादन देणारे वाण सोबतच रुंद सरी वरंबा तंत्रज्ञान , माती परीक्षणानुसार योग्य अन्न द्रव्यांचा वापर, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन तसेच काढणी पश्च्यात तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा कृषि विज्ञान केंद्राचा प्रामाणिक प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून आज येथे सोयाबीन एकात्मिक व्यवस्थापन तंत्रज्ञान या विषयावर शेती दिनाचे आयोजन करण्यात आले. शेती दिनानिमित्त शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकात वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती प्रगतशील शेतकरी दिलीप कुलकर्णी, राहुल तुवर यांनी दिली. सदर प्रात्यक्षिकात त्यांनी जिवाणू खताची बिजप्रक्रीया, सल्फर चा वापर, पिवळे आणि निळे चिकट सापळे, कामगंध सापळे, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे त्यांनी सांगितले.कृषि विद्या विभागाचे विषय विशेषज्ञ श्री. नारायण निबे यांनी शेती दिनाचे महत्व आणि शेती दिन का घ्यायचा तसेच एकात्मिक पद्धतीने सोयाबीन पिकाचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी उपस्थित शेतकरी मार्गदर्शन केले यांना मार्गदर्शन केले. कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख, डॉ. एस.एस. कौशिक यांनी सोयाबीन पिकात सध्य परिस्थितीत करावयाच्या उपाय योजना, बियाणासाठी सोयाबीन साठवण तंत्रज्ञान या विषयी माहिती दिली.यावेळी अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री. बाळासाहेब शिंदे, सरपंच वामनराव तुवर, विकास सोसायटी चे संचालक भागीरथ पवार, श्री. नामदेव नांदे, प्रगतशील शेतकरी मोहन तुवर, दिलीप विठ्ठल कुलकर्णी, अशोक तुवर हे उपस्थित होते. श्री. यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नारायण निबे तर श्री. प्रकाश बहिरट यांनी आभार मानले

# सरकारी रुग्णालय सेवकांची पतसंस्था मर्या. वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सरकारी रुग्णालय सेवकांची पतसंस्था मर्यादित या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न झाली.यावेळी या सभेच्या अध्यक्षस्थानी सरकारी रुग्णालय सेवकांची पतसंस्थेचे चेअरमन सदाशिव(भाऊसाहेब)उनवणे हे होते.तर प्रमुख उपस्थितीत व्हाईस चेअरमन दत्तात्रय आंबेकर, संचालक नरेश पेवाल,अज गोहेर ,दत्तात्रय आनंदकर, के.जी.फुडीया,विद्या चव्हाण, सुरेखा आंधळे,आशा शिंदे,राहुल माने,व्यवस्थापक जब्बार शेख,ऑडिटर प्रमोद वाळके आदी उपस्थित होते.यावेळी चेअरमन सदाशिव(भाऊसाहेब उनवणे



म्हणाले,सरकारी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी स्थापन झालेल्या पतसंस्थेत सभासदांच्या हितासाठी संचालक मंडळ सदैव कार्य करीत आहे.यावर्षी सभासदांना लाभांशाचे व मिठाईचे वाटप करण्यात आले आहे.तसेच निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे शेअर्स चा परतावा करण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला आहे.तसेच त्यांना सभासद करण्यासाठी नाममात्र पाचशे रुपयांच्या शेअर्स देण्यात येईल.सभासदांच्या भक्कम विश्वासामुळे संस्थेची प्रगती होत आहे.तसेच थकित कर्जदारांनी वेळेत कर्ज भरावे.यासाठी संचालक मंडळ पाठपुरावा करीत आहे.तसेच कर्जाची मर्यादा पुर्वी दोन लाख होती.आता पाच लाखांपर्यंत करण्यासाठीचा प्रस्तावपतसंस्थेने शासनाकडे पाठविला आहे.सभासदांच्या हितासाठी नेहमीच चांगले निर्णय घेण्यात येत आहेत. यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालाचे वाचन व्यवस्थापक जब्बार शेख यांनी केले. तर आभार व्हाईस चेअरमन दत्तात्रय आंबेकर यांनी मानल

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शंभर खाटांचे आरोग्य पथक रुग्णालयाचे भूमिपूजन

## उपमुख्यमंत्र्यांच्या विशेष प्रयत्नातून वाघळवाडी येथे साकारण्यात येणार अत्याधुनिक रुग्णालय

**बारामती । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते वाघळवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त शंभर खाटांचे आरोग्य पथक रुग्णालय तसेच वाघळवाडी-सोमेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, कार्यकारी अभियंता अमरजीत रामशे, अमोल पवार, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी किशोर माने आदी उपस्थित होते.

आरोग्य पथक रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आराखड्यातील कामांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेवून श्री. पवार म्हणाले, आराखड्यातील रस्ते, पाण्याची टाकी, शवागृह, वाहनतळ, वसतीगृह आदी कामांबाबत केलेल्या सूचनांचा समावेश करुन सुधारित आराखडा तयार करावा.विकासकामे करतांना परिसरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे. विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी केल्या.वाघळवाडी येथे १० एकर जागेत नवीन शंभर खाटांचे आरोग्य पथक रुग्णालयाच्या बांधकामासाठी ६४ कोटी ४८ लाख रुपये खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. रुग्णालय व परिसरामध्ये १० बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), ५ सुसज्य ऑपरेशन थिएटर, महिला व पुरुष सामान्य कक्ष (जनरल वार्ड), अतिदक्षता विभाग (आय.सी.यू/एन.आय.सी.यू), एक्स-रे कक्ष, प्रसूती व बालरुग्ण विभाग, उपहारगृह, औषधालय, अंतर्गत रस्ते, बगिचा (गार्डन), सुशोभिकरण, वाहनतळ, ८० मुला-मुलींसाठी वसतिगृह आदी



सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र:वाघळवाडी-सोमेश्वरनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता ४३७.२२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. केंद्रामध्ये महिला व पुरुषांकरिता प्रत्येकी ३ याप्रमाणे ६ खाटांची क्षमता, वैद्यकीय अधिकारी कक्ष, प्रयोगशाळा, ड्रेसिंग कक्ष, महिला कक्ष, शस्त्रक्रिया कक्ष (ऑपरेशन थिएटर), औषधसाठा कक्ष, स्वच्छतागृह, अभिलेख कक्ष, सोलार सुविधा, अग्निशमन यंत्रणा, फर्निचर, संरक्षक भिंत, वाहनतळ, जागा सपाटीकरणाची कामे करण्यात येणार आहे. या केंद्राअंतर्गत एकूण १३ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या प्रयत्नातून बारामती परिसरातील नागरिकांसाठी विविध आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. वाघळवाडी हे गाव बारामती शहरापासून ४० कि.मी. पेक्षा अधिक अंतर आहे, त्यामुळे रुग्णालयाच्या माध्यमातून तालुकाच्या दक्षिण व पश्चिम भागातील तसेच इतर परिसरातील नागरिकांना सर्व वैद्यकीय सोईसुविधा विनाविलंब उपलब्ध होणार आहेत तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त ठरणार आहे.

या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यातील कामगार तसेच स्तनदा माता, लहान बालकांचे लसीकरण, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवांचा लाभ होणार आहे.यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक पुरुषोत्तम जगताप यांच्यासह परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

## महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी मागितली केंद्राकडून मदत, निवेदन सादर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली आणि त्यांना महाराष्ट्रातील पाऊस, पूरस्थिती आणि त्यातून शेतकर्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती दिली. केंद्र सरकारकडून भरीव मदतीसाठी एक निवेदनही त्यांना सादर केले. महाराष्ट्रातील शेतकर्यांच्या पाठिशी आम्ही खंबीरपणे उभे राहू, असे आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिले. याशिवाय, महाराष्ट्रातील संरक्षण कॉरिडॉर, गडचिरोलीतील पोलाद उत्पादनासाठी सवलती, दहीसर येथील भारतीय विमानतळ प्राधीकरणाच्या जागेचे हस्तांतरण तसेच ईज ऑफ डुईंग बिझनेसच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकार करीत असलेले उपाय इत्यादींबाबत अतिशय सविस्तर चर्चा मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांशी केली.

**गडचिरोली पोलाद सिटी**

गडचिरोली येथे पोलाद सिटीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, हा एक आकांक्षित जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्य मायनिंग कॉर्पोरेशनला एरिया लिमिटमध्ये सवलत मिळावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. गडचिरोलीत पोलाद उत्पादनाची प्रचंड क्षमता असून, हे स्टील ग्रीन स्टील असणार आहे. चीनपेक्षाही कमी किंमतीत हे स्टील उपलब्ध होणार आहे. गडचिरोलीत सुमारे १ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक यापूर्वीच आलेली आहे. हा जिल्हा नक्षलमुक्त करुन विकासाच्या अमाप संधी यातून निर्माण होणार आहेत.

**३ संरक्षण कॉरिडॉर**

संरक्षण आणि अंतरिक्ष क्षेत्रात महाराष्ट्र हा एक भक्कम भागिदार म्हणून काम करतो आहे. महाराष्ट्रात १० ऑर्डिनन्स फॅक्टरी आहेत. भारताला लागणार्या एकूण शस्त्र आणि दारुगोळ्यापैकी ३० टक्के उत्पादन हे महाराष्ट्रात होते. त्यामुळे महाराष्ट्र हे संरक्षण कॉरिडॉरसाठी प्रभावी क्षेत्र आहे. त्यामुळे महाराष्ट्रात तीन संरक्षण कॉरिडॉरसंदर्भात एक तपशीलवार



सादरीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. यातील पहिला कॉरिडॉर पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, दुसरा कॉरिडॉर अमरावती, वर्धा, नागपूर, सावनेर आणि तिसरा कॉरिडॉर नाशिक-धुळे असा असेल. या तिन्ही कॉरिडॉरच्या माध्यमातून मोठी गुंतवणूक राज्यात येणार असून, त्यामुळे मोठा रोजगार सुद्धा निर्माण होईल. राज्य सरकारने यासंदर्भात ६०,००० कोटींचे सामंजस्य करार यापूर्वीच केले आहेत. त्यामुळे या कॉरिडॉरला मान्यता देण्यात यावी, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे केली.

**दहीसर येथील जागेचे हस्तांतरण**

दहीसर पूर्व येथील ५८ एकर जागेची मालकी ही भारतीय विमानतळ प्राधीकरणाकडे आहे. या जागेचे मेट्रो कारशेडसाठी एमएमआरडीएला हस्तांतरण करण्याचा आधी निर्णय झाला होता. पण, डिझाईनमध्ये झालेल्या बदलांमुळे एमएमआरडीएने माघार घेतली. या जागेची मागणी आता मुंबई महापालिकेने केली आहे. या भागात एचएफ रिसिव्हींग स्टेशन असल्याने या भागाचा संपूर्ण विकास खोळंबला आहे. हे हस्तांतरण झाल्यास या जागेचा सार्वजनिक उपयोगासाठी आणि विकासासाठी करता येईल. यामुळे उंचीचे प्रश्न सुद्धा सुटतील. त्यामुळे ही जागा मुंबई महापालिकेला देण्यात यावी, अशी मागणी या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या ८ आणि ९ ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार असून, नवी मुंबई विमानतळ आणि मेट्रो-३ या प्रकल्पांचा शुभारंभ ते करतील. नवी मुंबईला दि. बा. पाटील यांचेच नाव देण्यात येईल, तसा प्रस्ताव आम्ही पाठविला आहे, अशीही माहितीही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# हिंगणी बु.येथे ग्रामस्थांकडून औताने व सिद्धीकी यांचा सत्कार

**बीड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणी बु येथील कर्तव्यदक्ष शिक्षक सर्फराज सिद्धीकी व जितेंद्र औताने यांचा बदली निमित्त गावकऱ्यांनी सपत्नीक निरोप समारंभ आयोजित करून भव्य सत्कार केला.गावकऱ्यांच्या प्रेमाने सजलेला हा सोहळा भावनिक वातावरणात पार पडला.समारंभाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.त्यानंतर गावकऱ्यांनी फेटा, शाल, पुष्पगुच्छ, ड्रेस व साडी देऊन दोन्ही शिक्षकांचा व त्यांच्या पत्नींचा मानाचा सत्कार केला.

मान्यवरांचे प्रेरणादायी मनोगत समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच मा. अंकुशराव गोरे साहेब होते. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले, सिद्धीकी सर व औताने सरांनी गावातील मुलांमध्ये



शिस्त,गुणवत्ता आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी केलेले कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे.त्या दोघांनी शाळेसाठी खुप योगदान दिले, त्यांच्या योगदानामुळे शाळेचा दर्जा उंचावला असून गाव त्यांचा सदैव ऋणी राहील. आम्ही त्यांना पुन्हा आमच्या शाळेत यावे अशी विनंती करतो.विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग समारंभात शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली हृदयस्पर्शी भाषणे,माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला.शाळेतील विद्यार्थ्यांनी एकच सुर लावला – सर, तुम्ही शाळा सोडून जाऊ नका. पुन्हा आमच्या शाळेत परत या. त्यांच्या या भावनिक विनंतीने संपूर्ण वातावरण भारावून गेले. प्रमुख मान्यवर व ग्रामस्थांची उपस्थिती या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य अंकुश नाईकवाडे, तंटामुक्त समिती अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक कोकाटे सर,सहशिक्षक गायकवाड सर,राजकुमार कोकणे सर,शेख सर, रोहित वायसे सर उपस्थित होते.

ग्रामस्थांमध्ये देविदास जोगदंड, दिलीप वायसे,चंद्रकांत जोगदंड, स्वामी नाईकवाडे,शिवाजी जोगदंड, विजय वायसे,शमशाद सय्यद,अमोल वाससे, संभाजी वायसे,नवनाथ पवार, मच्छिंद्र सुरवसे,लक्ष्मण सपकाळ, रघुदास वैष्णव,भिकाराम वायसे,लगास,चव्हाण ताई,बोराडे ताई, राऊत मावशी यांची लक्षणीय उपस्थिती होती. विद्यार्थ्यांचे प्रेम,गावकऱ्यांचा जिव्हाळा,मान्यवरांची पुन्हा शाळेत परत या अशी मनापासून केलेली विनंती,आणि सपत्नीक सत्काराचा मानाचा सोहळा – या सर्वामुळे औताने सर व सिद्धीकी सर यांच्या जीवनातील हा निरोप समारंभ खऱ्या अर्थाने अविस्मरणीय सुवर्णक्षण ठरला.

# युवक महोत्सवात राजीव गांधी महाविद्यालयला व्दितीय पारितोषिक



**बीड (प्रतिनिधी)–** दि. ११ व १२ सप्टेंबर २०२५ दरम्यान र.भ. अट्टल महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हा युवक महोत्सवात राजीव गांधी महाविद्यालयाचा विद्यार्थी कलावंत चि. सुचित नाईकनवरे याने भारतीय शास्त्रीय ताल वाद्य या कला प्रकारात द्वितीय पारितोषिक प्राप्त केले आहे. त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात होणाऱ्या केंद्रीय युवक महोत्सवात सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. सुरेश नवले, सचिव सौ. अंजली नवले, प्राचार्य डॉ. ऋषीकेश कांबळे, प्र. प्रा. डॉ. केशर मुंडे, संघ प्रमुख प्रा. कल्याण वडमारे तसेच संस्था कार्यालय प्रमुख श्री. विजय पोपळे महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी पुढील वाटचाली करीता चि. सुचित नाईकनवरे यास शुभेच्छा दिल्या.

# मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा–भैय्यासाहेब तांगडे

**वडवणी (प्रतिनिधी)–**बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या आठवडाभरापासून पावसाने सारांश थैमान घातले होते. यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान देखील झाले आहे. हे नुकसान लवकर भरून येणे शक्य नसल्याने आर्थिक संकट देखील कोसळले असल्याने मराठवाड्यातील स्व–बाहेर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यंदाचे शैक्षणिक शुल्क माफ करावे. या मागणीसह राज्य सरकार मधील सर्व मंत्र्यांसह केंद्र सरकार मधील राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, विद्यमान लोकप्रतिनिधीचे तीन महिन्यांचे वेतन कपात करून हा निधी पूरग्रस्त भागात व शेतर्कयाच्या मदतीसाठी वापरावा. अशी मागणी वडवणी येथील पत्रकार भैय्यासाहेब तांगडे यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यासह मराठवाडा व अन्य जिल्ह्यात देखील पावसाने हहाकार केला आहे. पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे 'होत्याचं नव्हतं' झालं आहे.



शेतात सोयाबीन, बाजरी, तुरसह अन्य खरीप पिके हि पाण्याखाली नेस्ताभूत झाली आहेत. यामुळे शेतकरी राजा आर्थिक कचाट्यात सापडला आहे. इतर नुकसान देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. फक्त मदत देऊनच हे नुकसान भरून येईल असे नाही. तर या ठिकाणच्या नागरिकांचे मनोबल देखील खचले आहे. सरकारकडून मदतीची अपेक्षा असून प्रशासनाकडून पंचनामा करण्याचे ढोंग सध्या तरी दिसून येत आहे. हे काम पूर्ण झाल्या नंतरच मदत मिळेल तेव्हा मिळेल. परंतु सध्या बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात ज्या ठिकाणी प्रचंड पाऊस झाला आहे. त्या ठिकाणचे विद्यार्थी स्व–बाहेर जिल्ह्यात हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत आहेत. शिक्षणाची फीस कशी आणि कुठून भरावी ? असा गंभीर प्रश्न सध्या तरी पालकांपुढे उभा असून सरकारने मदत होईल तेव्हा होईल परंतु शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यावर्षीचे इयत्ता दहावी व बारावी स्टेट बोर्डासह व्यवसायिक शिक्षणासोबत, पदवी व पदव्युत्तर अन्य सर्व शिक्षणाचे शैक्षणिक शुल्क सरकारने निस्वार्थपणे माफ करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावावा अशी मागणी तांगडे यांनी केली आहे.

# न्यु व्हिजन् पब्लिक स्कुल येथे अटल लॅब शिक्षकांचे प्रशिक्षण

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)–**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई आणि लेन्ड अ टॅन्ड इंडिया पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रॉनिक्स युगात विद्याध्यांना नवनवीन तंत्रज्ञ शिक्षकांसाठी दि १९ सप्टेंबर रोजी अंबाजोगाई येथील न्यु व्हिजन पब्लिक स्कूल येथे अटल लॅबचे प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी जिल्यातील १९ शाळेतील ६० शिक्षक सहभागी झाले होते . सदरिल प्रशिक्षण हे सहा महीने चालणार असून दर महिन्याला तीन दिवस हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आजच्या या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन अंबाजोगाई डायटच्या अधिव्याख्याता डॉ. सुलक्षणा पवार, शाळेचे प्राचार्य एम. प्रशांतकुमार, अटल लॅब प्रमुख शहुल जगताप, विषयतज्ञ रामदास लोमटे, श्रीमती मिनाक्षी आटकुलवार,अमोल स्वामी, सुनील वाघमारे हे उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी अंबाजोगाई, धारूर, परळी, माजलगाव,



वडवणी या पाच तालुक्यातील अटल लॅब असलेल्या १९ शाळेतील ६० शिक्षक सहभागी झाले होते. शाळेतील विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स विषयक माहिती मिळण्याच्या उद्देशाने, अटल लॅब उभारण्यात आली असून यासाठीच्या प्रशिक्षण माध्यमातून विद्यार्थ्यांना कोडींग, रोबोटिक्स, थ्री-डी प्रिंटर, ड्रोन टेक्नॉलॉजी या विषयाची माहिती मिळणार आहे. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे तांत्रिक ज्ञान समृद्ध होऊन ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाची गोडी लागून नवनविन शोध घेण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास प्रमुख पाहुण्या डॉ. सुलक्षणा पवार यांनी व्यक्त केला. या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य एम. प्रशांतकुमार यांनी केले. तर उपस्थित सर्वांचे आभार प्रशिक्षणार्थी शिक्षक राहुल जगताप यांनी व्यक्त केले.

# मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे कोळी बांधवांना नुकसान भरपाई द्या


## मुंबई उपनगर पालकमंत्री आशिष शेलार यांचे प्रशासनाला निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

कोस्टल रोड आणि सागरी सेतूमुळे नुकसान होणाऱ्या कोळी बांधवांना नुकसान भरपाई देताना मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे देण्यात यावी, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज येथे दिले.

वांद्रे वर्सोवा सागरी सेतूमुळे

खार दांडा कोळीवाडा परिसरातील कोळी बांधवांचे मासेमारीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांना शासनातर्फे नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, मात्र मुंबई महापालिकेचे निकष आणि शासनाचे निकष यामध्ये तफावत आहे. कोस्टल रोडचा जो टप्पा मुंबई महापालिकेने बांधला त्यासाठी मुंबई महापालिकेने जे निकष तयार केले तेच निकष पुढे शासना ने ग्राह्य धरून खार दांडा पासून वर्सोवा ते भाईंदर पर्यंत जिथपर्यंत कोस्टल रोड जातो तिथपर्यंत या निकषाप्रमाणेच नुकसान भरपाई देण्यात यावी असे निर्देश मंत्री आशिष शेलार यांनी दिले. शासनाच्या निकषांप्रमाणे कमी नुकसान भरपाई मिळते तर वरळी सागर सेतूमुळे बाधित झालेल्या कोळी बांधवांना मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई मिळाली.यामुळे कोळी बांधवांनी याबाबत आक्षेप घेऊन उपनगर पालकमंत्री आशिष शेलार यांच्याकडे तक्रार केली होती याबाबत आज मुंबई मेरीटाईम बोर्ड, एम.एस.आर.डी.सी, एम.एम.आर.डी.एमुंबई महापालिका यांची संयुक्त बैठक मंत्री आशिष शेलार यांनी घेतली आणि या बैठकीमध्ये महापालिकेच्या निकषांचा समावेश करुन शासनाच्या अध्यादेशामध्ये सुधारणा करा, असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077